# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

**दिनांक ०८.०८.२०२६ शनिवार**

**१) मा. न्यायालयातुन आरोपीला सश्रम कारावासाची शिक्षा :—**

दिनांक ०७.०८.२०२६ रोजी मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र. ८, नागपुर, श्रीमती सोनाली बिहारी जगताप मॅडम यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. १६३९/२०२५ मधील, पोलीस ठाणे कोतवाली येथील अप. क्र. ८१/२०२५ कलम ३३१(३),३३१(४),३०५(ड),३१९(२),३३६(२),३३६(३),३४०(२) भान्यासं या गुन्ह्यातील आरोपी घनश्याम उर्फ संतोषकुमार उफ अंर्तयामी परमानंद दास वय ४५ वर्षे रा. नरसिंग प्रसाद चौक, लातीपाडा चौक, जि. नयागढ, ओडीसा याचे विरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम ३३१(३), भान्यास अन्वये ०१ वर्षे ०५ महिने सश्रम कारावासाची शिक्षा व २०,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०४ महिने अतिरीक्त साध्या कारावासाची शिक्षा तसेच, कलम ३३१(४), भान्यास अन्वये ०१ वर्षे ०५ महिने सश्रम कारावासाची शिक्षा व १५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०४ महिने अतिरीक्त साध्या कारावासाची, तसेच कलम ३०५(ड), भान्यास अन्वये ०१ वर्षे ०५ महिने सश्रम कारावासाची शिक्षा व १५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०४ महिने अतिरीक्त साध्या कारावासाची शिक्षा ठोठावली.**

दिनांक २७.०२.२०२५ चे २२.०० वा ते दिनांक २८.०२.२०२५ चे ०६.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कोतवाली हद्दीत भट सभागृहासमोरील, जैन मंदीर येथे आरोपी याने मंदीरात प्रवेश करुन मंदीरातील चांदीच्या मुर्ती व दानपेटीतील अंदाजे दोन लाख रूपये असा एकूण ११,८२,०००/— रु. किमतीचा मुद्येमाल चोरुन नेला. फिर्यादी मुकेश सोहनलाल जैन वय ४२ वर्ष रा. प्लॉट क्र. २४८, शिवशक्तीनगर, यशोधरानगर, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोतवाली येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीला दिनांक २१.०३.२०२५ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी पोउपनि. विलास गोरे यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती निलीमा देवगेकर व एम.एस.जैस्वाल यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्रीमती ममता सिंघानिया यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी सफौ प्रमोद येवले व गणेश डफ यांनी काम पाहिले.

**२) परिमंडळ क्र. १ अंतर्गत कुख्यात गुंडांची टोळी हद्दपार :—**

पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर, परिमंडळ क्र. १ अंतर्गत पोलीस ठाणे एमआयडीसी हद्यीत राहणारे कुख्यात गुन्हेगार टोळी प्रमुख नामे १) मयुर संतोष पटले वय २० वर्ष रा. वार्ड क्र. ४, जुना निलडोह वस्ती, एमआयडीसी, नागपूर तसेच त्याचे साथीदार २) मन अशोक चौरे वय २१ वर्ष रा. वार्ड क्र. २, अमरनगर वस्ती, ३) आशुतोष उर्फ नाककटया शंकर रवारे वय २४ वर्ष रा. वार्ड क्र. १, अमरनगर वस्ती, ४) दीपक उर्फ मल्लु मदन पासवान वय २४ वर्ष रा. वार्ड क्र. २, अमरनगर वस्ती, ५) भोला सुरेश राऊत वय २३ वर्ष रा. प्लॉट क्र. व्ही/९५, विश्वकर्मा कंपनी, एमआयडीसी ६) सुरज लक्ष्मी यादव वय २६ वर्ष रा. राजीवनगर, शांतिनिकेतन शाळेजवळ, एमआयडीसी, नागपूर यांचेविरूध्द पोलीस ठाणे एमआयडीसी येथे टोळी तयार करुन गंभीर स्वरुपाचे

गुन्हे ज्यामध्ये दुखापत करणे, धमकी देणे, खुन, खुनाचा प्रयत्न, शिवीगाळी करणे, असे विविध गुन्हे दाखल असुन, त्यांचेवर वारंवार प्रतिबंधक कारवाई करूनही त्यांचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमांचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता एमआयडीसी पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. श्री सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी, पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०१, नागपुर शहर यांचेकडे सादर केला. मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०१, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. ०१/२०२६ दिनांक ०७.०८.२०२६ अन्वये टोळीतील सर्व गुन्हेगारांना नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतून ०२ वर्षाकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केलेला आहे.

**३) परिमंडळ क्र. १ अंतर्गत कुख्यात ०३ गुंड हद्दपार :—**

अ) परिमंडळ क्र. १ अंतर्गत पोलीस ठाणे वाडी हद्यीत **प्लॉट क्र. ८३, इंद्रायणी नगर, दत्तवाडी, नागपूर येथे राहणारा गुन्हेगार इसम नामे नितेश प्रकाश सोनटक्के वय २० वर्षे** याचेविरूध्द पोलीस ठाणे वाडी येथे गंभीर स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल असुन, त्याचेवर वारंवार प्रतिबंधक कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता वाडी पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. श्री सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी, पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०१, नागपुर शहर यांचेकडे सादर केला. मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०१, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. ०७/२०२६ दिनांक ०६.०८.२०२६ अन्वये गुन्हेगारास नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतून ०२ वर्षाकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला आहे. तसेच पोलीस ठाणे वाडी हद्यीत प्लॉट क्र. ११६, इंद्रायणी नगर, दत्तवाडी येथे राहणारा गुन्हेगार इसम नामे **समिर अरुण काळे वय २४ वर्ष** याचेविरूध्द पोलीस ठाणे वाडी येथे गंभीर स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल असुन, त्याचेवर वारंवार प्रतिबंधक कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता वाडी पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. श्री सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी, पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०१, नागपुर शहर यांचेकडे सादर केला. मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०१, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. ०५/२०२६ दिनांक ०६.०८.२०२६ अन्वये गुन्हेगारास नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतून ०२ वर्षाकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला आहे.

ब) परिमंडळ क्र. १ अंतर्गत पोलीस ठाणे एमआयडीसी हद्यीत **झोन चौक, तकीयावाले दर्गाहजवळ, हिंगणा रोड, एमआयडीसी नागपूर येथे राहणारा गुन्हेगार इसम नामे विशाल उर्फ बिच्छु नविनप्रसाद शहा वय २३ वर्षे** याचेविरूध्द पोलीस ठाणे एमआयडीसी येथे गंभीर स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल असुन, त्याचेवर वारंवार प्रतिबंधक कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता एमआयडीसी पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. श्री सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी, पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०१, नागपुर शहर यांचेकडे सादर केला. मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०१, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. ०६/२०२६ दिनांक ०६.०८.२०२६ अन्वये गुन्हेगारास नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतून ०२ वर्षाकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला आहे.

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०७.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ११ केसेसमध्ये १५ ईसमावर कारवाई करून एकुण ५७,४३,४१०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०४ केसेसमध्ये १९ इसमांवर कारवाई करुन ३३,३६,१३०/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध

कलमांखाली २,९८८ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,७०,९००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक ०७.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०८.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये एकुण ०७ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या ०२ आरोपींना अटक. तसेच एमडी पावडर बाळगणाऱ्या ०३ आरोपींना अटक.**

अ) दिनांक ०७.०८.२०२६ चे १७.३० वा. ते २०.५० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, पोलीस ठाणे वाठोडा हद्यीत, पारडी विहीरगाव, आऊटर रिंग रोडचे सर्व्हीस रोडलगत, गौरी फॅमिली गार्डनचे बाजुला एका आयशर ट्रकचे केबिनमधुकर पांढरे रंगाचे बोरी उतरवून बाजुला असलेल्या सिल्व्हर रंगाचे कार क्र. एमएच ०२ बीझेड ८३४९ मधील इसमास देत असतांना, त्यांचेवर संशय आल्याने, पंचासमक्ष बोरी देणाऱ्या इसमास ताब्यात घेऊन त्याचे नाव पत्ते विचारले असता, त्यांने त्यांचे नाव १) अमित रमेश परतेली वय ४१ वर्ष रा. मनसर, ता. रामटेक जि. नागपूर असे सांगुन तो आयशर ट्रक क्र. एमएच ४० वाय ८३०८ चा चालक असल्याचे सांगितले. सिल्व्हर रंगाचे वोक्सवॅगन कारमधील इसमास त्याचे नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव २) शेख सुलतान उर्फ टिपु अशफाक शेख वय २५ वर्ष रा. प्लॉट क्र. २१२, आदिवासी प्रकाश नगर, आरटीओजवळ, कळमणा असे सांगितले. पंचासमक्ष ट्रकची झडती घेतली असता, ट्रकचे केबिनमध्ये पांढऱ्या रंगाच्या दोन बोरीमध्ये अंमली पदार्थ हिरव्या रंगाचा गांजा मिळुन आला. तसेच सिल्व्हर रंगाचे वोक्सवॅगन कारची झडती घेतली असता, त्यातील पांढरे रंगाचे एका बोरीमध्ये गांजा मिळून आला. दोन्ही आरोपींचे ताब्यातुन एकूण तीन प्लास्टीक बोरीमधुन हिरव्या रंगाचा गांजा एकूण वजनी ३० किलो ८०० ग्राम, आयशर ट्रक, व कार तसेच ०२ मोबाईल फोन असा एकुण २३,०५,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींना विचारपुस केली असता, त्यांनी नमुद गांजा पाहिजे आरोपी महेशबाबु उर्फ साबीर शेख अताऊल रा. हसनबाग, नागपूर याचे मदतीने आणल्याचे सांगितले. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब)(ii)(क),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे वाठोडा येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. दोन्हा आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींना मुद्देमालासह वाठोडा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भारत क्षीरसागर, सपोनि आनंद बिचेवार, पोहवा शेख इमरान, ज्ञानेश्वर भोगे, विवेक आढाव, पवन गजभिये, नितीन साळुंके, पोअं. संतोष शेंद्रे, नितीन राठोड, धनराज मसराम, राहुल पाटील व मपोहवा अनुप यादव यांनी केली.



ब) दिनांक ०७.०८.२०२६ चे १३.१० वा. ते १५.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा पथकातील अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत, पारडी विहीरगाव, आऊटर रिंग रोडचे सर्व्हीस रोडलगत, गौरी फॅमिली गार्डनजवळ मिळालेल्य वर्णनाचा एक ईसम अॅक्सेस गाडीवर संशयीतरित्या दिसल्याने ताब्यात घेवुन पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव एजाज अहमद शेख अहमद वय ३५ वर्ष रा. प्लॉट क्र. ५११, हसनबाग, चांदणी चौक समोर, साबीर पानठेल्याजवळ, नागपूर असे सांगितले. त्यांचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरुन, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन, त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात एका झिपलॉक पन्नीमध्ये अंमली पदार्थ एमडी पावडर मिळून आली. वजन केले असता, २५ ग्रॅम इतके भरले. आरोपीचे ताब्यातुन एमडी पावडर, ०१ मोबाईल फोन व मोपेड असा एकूण ३,७५,०००/— रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने त्याचे साथीदार पाहीजे आरोपी १) शाहरुख अहमद सगीर अहमद वय २६ वर्ष २) सिराज अहमद सगीर अहमद वय २४ वर्ष दोन्ही रा. हसनबाग, चांदणी चौक समोर, साबीर पानठेल्याजवळ, नागपूर, ३) मोहम्मद अबरार अंसारी वय २५ वर्ष रा. कविट झाड विहीरजवळ, हसनबाग, नागपूर यांचे मदतीने आणल्याचे सांगितले. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. त्यांचे कृत्य हे कलम ८(क),२२(क),२९ एन.डी.पी.एस. अॅक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे वाठोडा येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव वाठोडा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. आरोपींस अटक करण्यात आली आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नागरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शानाखाली, पोनि. भारत क्षीरसागर व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**<u>५) गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पोलीसांची कामगिरी :— जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपींना अटक.</u>**

दिनांक ०२.०८.२०२६ चे २१.१५ ते २१.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी प्रज्वल प्रदीप जाने वय २३ वर्ष रा. वार्ड क्र. १, खापरखेडा हे त्यांचे मित्र हिमांशु रवि कडू वय २३ वर्ष २) रोहीत मेश्राम वय २५ वर्ष दोन्ही रा. वार्ड क्र. २, खापरखेडा व इतर मित्र हे पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीत पौनीकर गल्ली, वार्ड क्र. २, कालेश्वरचे घराजवळ चहा पित गप्पा गोष्टी करीत असतांना, आरोपीतांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन घटनास्थळी दुचाकी गाडयांनी येऊन फिर्यादी व त्यांचे मित्रांचे अंगावर येवून हातबुक्क्यांनी तसेच हिमांशु कडू व रोहीत मेश्राम यांना जिवे ठार मारण्याचे उद्येशाने शस्त्राने दुखापत करुन गंभीर जखमी केले होते. जखमींना उपचाराकरीता न्यु लाईफ हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले होते. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे खापरखेडा येथे आरोपींविरूध्द कलम १०९(१),११५(२),११८(२),१८९(२),१९०,१९१(३), भा.न्या.सं. सहकलम ४,२५ भा.ह.का. सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल केला होता.

गुन्हयाचे तपासादरम्यान गुन्हेशाखा युनिट क्र. ६ चे अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदारामार्फत माहिती काढून, गुन्हयातील आरोपींना निष्पन्न करुन आरोपी नामे १) हेमंत उर्फ सुदामा मधुकर चापाडहाके वय २६ वर्ष रा. वार्ड क्र. २, खापरखेडा, नागपूर २) शांतनु उर्फ दद्दु राजेंद्र बागडे वय १९ वर्ष रा. वार्ड क्र. १, चिचोली ता. सावनेर जि. नागपूर ३) जितु रामचंद कनोजिया वय २६ वर्ष रा. वार्ड क्र. १, विद्याविहार शाळेजवळ, ता. सावनेर जि. नागपूर व एका विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेतले आहे. आरोपींना व विधीसंघर्षग्रस्त बालकास खापरखेडा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भरत कन्हाडे व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.




**<u>६) पारडी पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस.</u>**

दिनांक ०७.०८.२०२६ चे ०४.३० वा. चे सुमारास, पारडी पोलीसांचे पथक पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, गंगाबाग दत्तचौक, सोनपापडी कंपनीजवळील गल्लीत एका विनानंबरचे मोपेडवर तिन इसम संशयीतरित्या फिरतांना दिसल्याने, त्यांचा पाठलाग करुन त्यांना ताब्यात घेतले. पंचासमक्ष नाव पत्ता विचारला असता, त्यांनी त्यांची नावे १) हिमांशु सतिश मोरे वय १९ वर्ष रा. गोंडपुरा, भांडेवाडी, नागपूर २) राहुल किशोर गेडाम वय २३ वर्ष रा. पुंजाराम वाडी, डिपटी सिग्नल कळमणा व एक विधीसंघर्षग्रस्त बालक असल्याचे समजले. पंचासमक्ष त्यांची अंगझडती घेतली असता, त्यांचे ताब्यातुन दोन धारदार चाकु मिळून आले. मोपेडविषयी विचारपुस केली असता, आरोपींनी नमुद वाहन पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीतुन चोरी केल्याचे

सांगितले. गुन्हे अभिलेख तपासला असता, भांडेवाडी येथे चोरीचा गुन्हा दाखल होता. आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालक यांचे ताब्यातुन ०२ चाकु व पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीतुन चोरी केलेली मोपेड क्र. एमएच ४९ वाय ७९०७ असा एकूण ७०,४००/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालक यांचेविरुध्द पोलीस ठाणे पारडी येथे कलम ४,२५ भाहका सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल करुन ०२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (पारडी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. विवेकानंद भारती, पोउपनि. अरविंद कोल्हारे, सचिन जाधव, पोहवा. शैलेष कुंभलकर, पोअं. निखिल मोहीते, योगेश बोरेकर, नितीन कनोजिया, आशिष रामटेके, विशाल जाधव यांनी केली.



**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**